# महाराष्ट्र शासन

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला

**दुरध्वनी क्र.२४३१९६०,२४३७०७८,२४३४४०४ फॅक्स क्र.(०७२४) २४३७०७८**

जा.क्र.शावैमवसरुअ/आस्था १,२/वैद्यकीय अधिकारी /जाहिरात/ ३८६२ /२०२२ दि.१६/०६/२०२२

## जाहिरात

**विषय - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ४ महीन्यांकरीता (१२० दिवस) वैद्यकीय अधिकारी ही पदे भरण्याबाबत....**

संदर्भ - शासन निर्णय क्र.एमईडी-३२०२/सिआर-२२१/०२/शिक्षण-१ दि. २१ जुन २००५

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये मंजुर असलेली वैद्यकीय अधिकारी सवंर्गातील पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात **४ महीण्यांकरीता (१२० दिवस)** भरण्यात येत आहे. पदांची संख्या व आरक्षण याबाबतची माहिती खाली दर्शविण्यात आली आहे. उपरोक्त पदांकरीता अर्हता प्राप्त उमेदवारांकडून विहीत नमुन्यात (offline) अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात देण्यात येत आहे. तसेच सदरची जाहिरात या महाविद्यालयाच्या (Website : www.gmcakola.in) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**पदाचे नाव - वैद्यकीय अधिकारी ३८ पदे**

| अ.क्र. | एकुण रिक्त पदे | अ.जा (13%) | अ.ज. (7%) | वि.जा.(अ) (3%) | भ.ज.(ब) (2.5%) | भ.ज.(क) (3.5%) | भ.ज.(ड) (2%) | वि.मा.व (2%) | इतर मागास वर्ग (19%) | आर्थिकदुष्टया दुर्बल घटक (10%) | खुला (38%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३८ | ०५ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०४ | १४ |

- **वेतन -** वैद्यकीय अधिकारी - शासकीय नियमाप्रमाणे

- **शैक्षणिक पात्रता -**
  यु.जी./ पी.जी. पदवी ही भारतीय आयुर्विज्ञान परिषत नवी, दिल्ली मान्यता प्राप्त असावी.
  शैक्षणिक पात्रतेनुसार गुणवत्ता यादी तयार केली जाईल
  गुणवत्ता यादी ४ महिन्यापर्यंत ग्राहय धरण्यात येईल व जसे जसे वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त होतील तसे तसे प्रतिक्षा यादी नुसार वैद्यकीय अधिकारी पदे भरण्यात येतील.

- **प्राधान्यक्रम -**
  प्रथम प्राधान्य हे बंधत्रित उमेदवारांना देण्यात येईल की ज्यांनी महाराष्ट्रातून पदवी/पदव्युत्तर शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा महानगरपालिकेच्या महाविद्यालयातुन पुर्ण केले असेल.

**मा. जिल्हाधिकारी, अकोला यांचे आदेशान्वये तात्पुरते वैद्यकीय अधिकारी (१२० दिवस) यांची दर ४ महिन्याला जाहिरात देऊन पदे भरण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. पुर्णनियुक्ती काढण्यात येऊ नये असे आदेशित करण्यात आल्याने संपुर्ण ३८ पदांची जाहिरात देण्यात येत आहे.**

- **अर्ज करण्याची पध्दत -**

या महाविद्यालयाच्या (Website : www.gmcakola.in) या संकेतस्थळावर सदर जाहीरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर जाहीरातीसोबत अर्जाचा नमुना जोडण्यात आला असुन उमेदवारांनी तो डाऊनलोड करुन अर्ज भरुन तसेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक ते प्रमाणपत्रे जोडुन अर्ज कार्यालयात दि. १७.०६.२०२२ ते दि. २२.०६.२०२२ रोजीपर्यंत (**कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजे पर्यंत**) सादर करावे. तसेच प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावे.

**निवड प्रक्रिया संबंधीत कार्यक्रम खालीलप्रमणे राहील.**

| | | |
|---|---|---|
| १) संकेमस्थळावर अर्ज उपलब्ध असण्याचा कालावधी | - | दि. १७.०६.२०२२ ते दि. २२.०६.२०२२ |
| २) अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारिख | - | दि. २२.०६.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| ३) मुलाखत व प्रमाणपत्र पडताळणी दिनांक | - | दि. २४.०६.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता |

- **टिप -**

**१) सदर जाहीरातीतील पदांमध्ये वेळापत्रकात बदल करण्याचा अधिकार निवड समितीस राहील.**

**२) ज्या उमेदवारांनी यापुर्वी कार्यालयात नियुक्ती मिळण्या करीता विनंती अर्ज सादर केले आहेत अशा उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाही. त्यांना जाहिरातीनुसार नविन अर्ज सादर करावे लागतील.**

- **अटी व शर्ती -**

१) उमेदवाराने अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या सांक्षाकीत प्रती जोडणे आवश्यक आहे.

२) अर्ज विहीत नमन्यातच सादर करावा लागेल, अर्ज विहीत नमुन्यात नसल्यास अथवा अपुर्ण असल्यास अर्ज स्वीकारल्या जाणार नाही.

३) मुलाखती करीता स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही, तसेच अर्जदारांना मुलाखतीस स्वखर्चाने १ तास अगोदर आवश्यक त्या सर्व मुळ प्रमाणपत्रांसह उपस्थित रहावे लागेल.

४) उमेदवार मागासवर्गीय असल्यास सक्षम अधिका-याचे जात प्रमाणपत्र, वैधता प्रमाणपत्र तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळुन इतर सर्व मागास प्रवर्गातील उमेदवारां करीता उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे चालु वर्षाचे (Non Creamy Layer) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५) वरिल सर्व जागा पुर्णवेळ आहे. निवड झालेल्या उमेदवाराने २४ तास कर्तव्यावर उपस्थित असणे बंधनकारक राहील.

६) निवड झालेल्या उमेदवारांनी संबंधित विभागाचे विभागप्रमुख यांच्या आदेशानुसार काम करणे बंधनकारक राहील.

७) उमेदवारास जर काही कारणास्तव राजीनामा द्यावा लागत असेल तर एक महीना अगोदर लेखी पुर्व सुचना संबंधीत विभागाच्या विभागप्रमुखांमार्फत देणे आवश्यक राहील अन्यथा एक महिन्याचे वेतन कपात करण्यात येईल.

८) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना खाजगी संस्थेत, मंडळात, निमशासकीय कार्यालयामध्ये कोणत्याही कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

९) वरील जाहीरातीत पदांच्या संख्येत कमी अधिक करण्याचे तसेच आरक्षणामध्ये बदल करण्याचे व निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याचे किंवा प्रलंबीत ठेवण्याचे अथवा नियुक्ती आदेश रदद् करण्याचे व सदर जाहीरात रदद् करण्याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत.

१०) जाहीरात दिलेल्या पदाकरीता नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असुन कोणतीही पुर्व सुचना व कोणतेही कारण न दर्शविता समाप्त करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहील.

११) जे उमेदवार इतर संस्थेत कार्यरत आहेत त्यांनी सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१२) मुलाखतीच्या दिवशी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे वय ३८ वर्ष व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

१३) अपघात कक्षातील वैद्यकीय अधिकारी हे वैद्यकीय अधिक्षक व उपअधिक्षक यांच्या अधिपत्याखाली काम करतील.

१४) अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख अस्थिव्यंगोपचार शास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील, व सदरील वैद्यकीय अधिकारी हे अस्थिव्यंगोपचारशास्त्र तज्ञ असतील तर ते अपंग बोर्डाचे तसेच बी. फार्म बोर्डाचे काम प्राध्यापक व विभागप्रमुख अस्थिव्यंगोपचारशास्त्र करुन घेतील.

१५) बधिरीकरणशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख बधिरीकरणशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील व हे प्रामुख्याने सर्जिकल एस.आय.सि.यु.चे काम बघतील.

१६ ) क्षकिरणशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख क्षकिरणशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील.

१७) शल्यचिकीत्साशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख शल्यचिकित्साशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील

१८) बालरोगचिकित्साशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख बालरोगचिकित्साशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील.

१९) रक्तपेढी विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख विकृतीशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील.

२०) न्यायवैद्यकशास्त्र विभागातील वैद्यकीय अधिकारी हे प्राध्यापक व विभागप्रमुख न्यायवैद्यकशास्त्र यांच्या अधिपत्याखाली काम करतील.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वोपचार रुग्णालय, अकोला.

**प्रति,**

१) सर्व प्राध्यापक व विभागप्रमख, शा.वै.म. अकोला.
२) नोटीस बोर्ड, शा.वै.म. अकोला.
३) नोटीम बोर्ड, ग्रंथालय, शा.वै.म. अकोला.
४) नोटीस बोर्ड, निवासी होस्टेल मुलींचे/मुलांचे शा.वै.म. अकोला.
५) संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

**प्रत** - १) मा. आयुक्त (वैद्यकीय शिक्षण), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) मा. संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३) अधिष्ठता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, महाराष्ट्र राज्य.